MHAU050029502010

**<u>निशाणी क्र.१३३ वरिल आदेश</u>**
**(आदेश पारित दि.३१.०७.२०२३)**

प्रस्तुतचा अर्ज हा ति–हाईत इसम नामे धोंडीरामसिंग राजपूत यास प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी म्हणून समाविष्ट करणेस परवानगी मिळावी याकरिता दिवाणी प्रक्रिया संहितेच्या तरतुद आदेश १ नियम १० खाली वादींच्या वतीने दाखल केलेला आहे.

२. वादींचे थोडक्यात अर्जकथन की, प्रस्तुत दावा प्रलंबित असतांना प्रकरणातील प्रतिवादी क्र.५ व ६ यांनी वादमिळकत सर्व्हे क्र.३५६/२ पैकी ३२ गूंठे जमीन खरेदीखताने अर्जात नमुद इसम नामे धोंडीरामसिंग राजपूत यास विक्री केली असून सदर इसम दाव्यात पक्षकार म्हणून सामील करणे गरजेचे आहे. तरी अर्ज मागणीप्रमाणे मंजूर करण्यात येऊन ति–हाईत इसम यास प्रतिवादीपणात सामील करण्याची परवानगी मिळावी अशी विनंती अर्जात वादींनी केली आहे.

३. प्रस्तुत अर्ज मागणीस प्रतिवादींच्या वतीने विरोध दर्शविण्यात आला असून दाव्यातील प्रतिवादींचे म्हणणे की, प्रस्तुत अर्जातील मागणी कायदेशीर नसल्यामुळे तसेच अर्ज मुदतीत सादर केलेला नसल्यामुळे तो फेटाळण्यात यावा असे म्हणणे मांडलेले आहे.

४. उभय पक्षाचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

५. अर्जमागणी व त्यावरिल प्रतिवादींनी दाखल केलेले म्हणणे विचारात घेऊन प्रकरणातील कागदपत्र पडताळले. वादींनी प्रस्तुतचा दावा हा दि.२३.११.२०१० रोजी मौजे कसबे वैजापूर, ता. वैजापूर येथील सर्व्हे क्र.३५६ व इतर मिळकती संदर्भात दाखल केलेला असून वादींनी दाव्यात वादमिळकतीबाबत निरंतर ताकीदीची मागणी प्रतिवादींविरुध्द केलेली आहे. अर्जात नमुद खरेदी व्यवहाराची तारीख विचारात घेता ती दावा दाखल झाल्यानंतरची अशी आहे. उभयपक्षातील वादाचे स्वरुप पाहाता प्रकरणात दाव्याचा गुणवत्तेवर निर्णय होण्यासाठी ति–हाईत इसम नामे धोंडीरामसिंग राजपूत याची दाव्यात उपस्थिती पक्षकार म्हणून आवश्यक दिसून येत आहे. एकूण बाबीचा व परिस्थितीचा विचार करता वादींचा अर्ज मंजूर होण्यास पात्र असा असल्याने खालील आदेश पारित करण्यात येतो.

**आदेश**

१. ति–हाईत इसम नामे धोंडीरामसिंग छन्नुसिंग राजपूत, रा. मुंजाआळी, वैजापूर, ता. वैजापूर यांना दाव्यात प्रतिवादी क्र.१४ म्हणून समाविष्ट करण्यास परवानगी देण्यात येते.

२. तसेच वादींनी मुळ दाव्यात तशी दुरुस्ती करुन दुरुस्ती दावा नक्कल सादर करावी असे आदेशीत करण्यात येते.

३. वादींनी आदेशाची पुर्तता केल्यास सदर ति–हाईत इसम यास दावा समन्स काढण्यात यावे.

४. खर्चाबाबत आदेश नाही.

Digitally signed by KARADE RATILAL MACHINDRA
Date: 2023.07.31 14:56:24 +0530

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

(आर. एम. कराडे)

दिनांक ३१.०७.२०२३ सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
वैजापूर

CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : Shri. G. M. Zade.<br>(Stenographer Grade-II) |
| Court | : Shri. R. M. Karade.<br>Jt. Civil Judge, Sr. Dn.,<br>Vaijapur. |
| Date | : 31-07-2023 |
| Order signed by the presiding officer on | : 31-07-2023 |
| Order uploaded on | : 31-07-2023 |